# अमरजित जाधवला ७० लाखांचे पॅकेज



अमरजित जाधव

पुणे : के. जे. शिक्षण संस्थेच्या ट्रिनिटी अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक अभियांत्रिकीचा विद्यार्थी अमरजित जाधव याला अमेरिकास्थित बहुराष्ट्रीय कंपनीत ७० लाख वार्षिक पॅकेज असलेली नोकरी मिळाली आहे, तर संस्थेच्या के. जे. अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनचा विद्यार्थी विपुल कदम याला मलेशिया येथे कॅपजेमिनी कंपनीत १८ लाखाचे पॅकेज असलेली नोकरी मिळाली आहे. सहयोगी अधिष्ठाता प्रा. प्रतिभा चव्हाण, विभागप्रमुख प्रा. प्रमोद चव्हाण यांनी या दोन्ही विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी मेहनत घेतली आहे. संगणक अभियंता असलेल्या अमरजित याने ट्रिनिटी महाविद्यालयातुन अभियांत्रिकीची पदवी घेतली आहे.

के. जे. शिक्षण संस्थेने अमरजितला 'जीआरई' व 'टोफेल' या परीक्षांची तयारी करण्यासाठी; तसेच अमेरिकेत मास्टर इन कम्प्युटर सायन्स (एमएस) करण्यासाठी मार्गदर्शन व अर्थसाह्य पुरवले होते.